# जिल्ह्याचे नाव : नांदेड

## योजना

१.गाव तिथे खोडा
२.गाव तेथे स्मशानभूमी
३.मूक्या जनावरांना पाणी
४. सुनो नेहा
५.माझं गाव – सुंदर गाव
६. माझी मुलगी माझा अभिमान
७. आई बाबांची शाळा
८.नांदेड – ग्रामीण पर्यटन
९. वॉर रूम
१०. शाळेबाहेरची शाळा
११. मियावाकी – घनदाट वृक्ष
१२. एकाच दिवशी जलपूजन
१३. पिंपळशेंडा
१४. एक तास वाचनाचा

# १ गाव तिथे खोडा

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत जनावरांचे लसीकरण व औषधोपचार केले जातात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी क्षेत्र भेटीदरम्यान या रुग्णालयाला भेटी दिल्या. लसीकरणासाठी आलेल्या जनावरांना उभे राहण्याची सुद्धा सुविधा नव्हती. पारंपारिक पद्धतीनेच दोरीने बांधून उपचार करत असल्याचे दिसून आले. आधीच आजाराने त्रस्त जनावरांना अशा प्रकारचा त्रास होणे हे वेदनादायक होते. माणसं आपली व्यथा सांगतील. पण मुकी प्राणी कोणाला सांगणार?

जनावरांचे लसीकरण, विविध उपचार करताना जनावरांना नीट उभे राहता येत नसल्यामुळे उपचार करताना जनावरांबरोबर डॉक्टरांची तारांबळ उडायची ही निदर्शनास आल्यानंतर पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करुन गाव तेथे खोडा हा उपक्रम हाती घेण्यात आला. तत्कालीन पालकमंत्री आणि जिल्हा परिषद पदाधिकारी यांचा सक्रिय सहभाग मिळाला.

जिल्हा परिषद स्तरावर नियोजन करण्यात आले. मानव विकास अंतर्गत 9 तालुक्यांमधे 81 लक्ष 92 हजार रुपये निधी उपलब्ध करून 545 गावात खोडे उपलब्ध करून देण्यात आले. तसेच जिल्हा परिषद उपकर मधून 2021-22 मध्ये 80 ठिकाणी 12 लक्ष रुपयांचे 80 गावात खोडे बसविण्यात आले. तसेच जिल्हा परिषद उपकर 2022-23 मध्ये पुन्हा 12 लक्ष रुपयांचे 61 गावात असे एकूण 687 खोडे बसवण्यात आले आहेत. पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुवैद्यकीय रुग्णालयांमध्ये अजूनही 200 गावात खोडे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे.

लंपी स्किन आजाराच्या प्रादुर्भावादरम्यान दरम्यान तसेच रुग्णांच्या विविध उपचारांसाठी हे खोडे अतिशय उपयुक्त ठरले . नांदेड जिल्ह्यात राबवलेल्या या उपक्रमाची दखल मा. विभागीय आयुक्त कार्यालयाने घेतली आहे. विभागात सर्व ठिकाणी नांदेड पॅटर्ननुसार खोडे व्हावेत असे आदेश देण्यात आले आहेत. या खोड्यांमुळे जनावरांना नियंत्रित करणे अतिशय सुलभ झाले आहे. रोग निदान, औषधोपचार आणि शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणाऱ्या वेळेची बचत झाली. पशुपालक, पशुवैद्यक आणि जनावरे यांना कोणतीही इजा न होता शास्त्रीय दृष्ट्या योग्य औषधोपचार करणे शक्य होत आहे.

प्रतिक्रिया

गावामध्ये खोडा उपलब्ध करून दिल्यामुळे जनावरांना योग्य पद्धतीने  निदान , लसीकरण,  तपासणी व औषधोपचार करणे सुकर झाले.

-निळकंठ शंकरराव डाकोरे

पेठवडज ता. कंधार

आमच्या पशुधनाला लसीकरण व  औषधोपचारासाठी खोडा नसल्यामुळे खूप त्रास व्हायचा. हे डोळयाला देखवत नव्हते , अनेक वेळा जनावरासह आम्हालाही दुखापत होत . परंतु आता खोड्यामुळे या सर्व समस्यांचे निराकरण झाले आहे.

रामराम व्यंकटराव कल्याणे

धनज तालुका मुदखेड







# २ गाव तेथे स्मशानभूमी

ग्रामीण दूर्गम भागातील गाव पातळीवर स्मशानभूमी उपलब्ध नसल्यामुळे पार्थिव देहावर अंतिम संस्कार करण्यासाठी अनेक वेळा गंभीर परिस्थिती निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असे. अंत्यविधीची सोय नसल्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, ही बाब लक्षात घेऊन गाव तेथे स्मशानभूमी असणे आवश्यक आहे.

बऱ्याचदा गावापासून लांब व अडचणीच्या कुठली ही सोय नसलेल्या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्याची वेळ येई. आधीच घरात एखाद्याच्या मृत्यूने घरात दुःखी वातावरण. त्यात अंत्यसंस्कार करण्याची समस्या निर्माण होई. काही ठिकाणी खाजगी मालकीच्या जमिनीवर अंत्यसंस्कार करावे लागत. या बाबी लक्षात घेऊन गाव तेथे स्मशानभूमी तयार करण्याचे ठरविले.

जिल्ह्यात 1310 ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी 1099 ग्रामपंचायतीमध्ये स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध होती. 313 ग्रामपंचायतीमध्ये मात्र स्मशानभूमीची सुविधा नाही हे लक्षात आल्यानंतर गाव स्तरावर या संदर्भाने सर्वे करण्यात आला. सर्वे केल्यानंतर असे लक्षात आले की, 133 गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागाच उपलब्ध नाही. त्यासाठी बहुतांच्या गायरान जमिनीपैकी 67 गावात गायरान जमिनीवर आणि 65 गावांमध्ये खाजगी जमिनीची सुविधा योजनेतून जमिनी खरेदी केल्या. जमीन संपादन करताना आणि खाजगी जमीन खरेदी करताना आलेल्या अडचणी जमीन मालकांशी सुसंवाद करून दूर केल्या. जागेची सनद ग्रामपंचायतीला वाटप करण्यात आली. याचे तत्कालीन पालकमंत्री यांच्याशी पाठपुरावा करून जिल्हा नियोजन समिती मधून साडेपाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

आज रोजी नांदेड जिल्ह्यात 1231 ग्रामपंचायतीमध्ये स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामध्ये काही स्मशानभूमींना शेड आणि दहन सांगाडा उपलब्ध करून देणे शिल्लक आहे. यासाठी 17 कोटी 50 लाख रुपयांचा निधी जिल्हा नियोजन समितीकडे आराखडा तयार करून मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

अंतिम संस्कारचे ठिकाण रमणीय व सुंदर असावे, क्षणभर तिथे थांबावे असे वाटावे, यासाठी स्मशानभूमीच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. सर्व परिसर सुशोभित करण्यात आला आहे व पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याचा परिणाम म्हणजे गाव पातळीवर आता अशा

प्रकारची  स्मशानभूमी असावी हा विचार रुजत आहे आणि गावकरी जागेसह पर्याय घेऊन प्रस्ताव सादर करत आहेत.

प्रतिक्रिया

जिल्ह्यातील पहिली आयएसओ स्मशानभूमी

लोहा तालुक्यातील रायवाडी येथील स्मशानभूमी आयएसओ होण्याच्या मार्गावर असून, याठिकाणी पाण्याची व लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच वृक्ष लागवड बसण्यासाठी सिमेंट बेंचची सुविधा देखील करण्यात आली. रायवाडी हे जिल्ह्यातील नव्हे तर कदाचित राज्यातील पहिली आयएसओ स्मशानभूमी असेल.

: - सरपंच मनीषा विभूते  रायवाडी ता. लोहा





# ३ मुक्या जनावरांना पाणी

जनावरांनाही पाण्यासाठी  रानोमाळ भटकंती करावी लागत असतांना या मुक्या जनावरांची आर्त हाक ऐकून  नांदेड जिल्हा परिषदेने जिल्ह्यात पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या ठिकाणी  103 हौद बांधले आहेत. गावातील व शेजारच्या गावातील अतिशय मोठ्या प्रमाणात पशुधन उपचारासाठी येत असल्यामुळे या हौदाचा जनावरांना आधार मिळाला आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी गुरांची भटकंती सुरू असते. काही शेतकऱ्यांनी जनावरे मोकळी सोडली आहेत. यातील अनेक जनावरे परिसरात पाण्याच्या शोधात फिरतात. जनावरांना गोठ्यातून चरायला सोडल्यानंतर रस्त्यात एखादा ओढा, पाण्याचे डबके अथवा पानवाठा असेल त्या ठिकाणी जनावर पाणी पितात. त्यासाठी सर्वसाधारण शेतकरी फारशी विशेष व्यवस्था करत नाहीत असे दिसून आले.

जनावरांना पिण्याचे स्वच्छ पाणीसुद्धा मिळत नाही हे लक्षात येताच नांदेड जिल्हा परिषदेने गावातील पशुवैद्यकीय रुग्णालयात  पिण्याच्या पाण्याचा हौद निर्मितीचा उपक्रम हाती घेतला.

सन 2021-22 अंतर्गत जिल्हा परिषद उपकरातून 12 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून जिल्ह्यात 103 पशुवैद्यक दवाखान्यात जनावरांना पिण्याच्या पाण्याचे हौद निर्माण केले आहेत. शासनाच्या महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाकडे उपलब्ध असलेले उत्कृष्ट प्रकारच्या जनावरांना पिण्याच्या पाण्याचा तयार हौदांची निवड करून खरेदी करण्यात आले.

लोकसभागातून पिण्याच्या पाण्यासाठी  10 हौद तयार करण्यात आले आहेत. या हौदांची रंगरंगोटीही करण्यात आली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत हौदांना नळ जोडणी करून दिवस रात्र पाणी दिले जाणार आहे.

प्रतिक्रिया

पशुवैद्यक दवाखान्यात पिण्याच्या पाण्याचा हौद झाल्यामुळे मुक्या जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय करून जिल्हा परिषदेने उपकृत केले.

- चंदू पिंपळे

डोंगरगाव तालुका मुदखेड

पूर्वी जनावरांना पशुवैद्यकीय दवाखान्यात दाखवण्यासाठी आल्यानंतर येथे पिण्याची सुविधा नव्हती. गावात कुठेतरी व्यवस्था पहावी लागायची. परंतु आता पशुवैद्यकीय दवाखान्यातच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे जनावरांसाठी खूप चांगली सोय झाली आहे.

-सुभाष शंकर बनसोडे

दिग्रस बु.





# ४. सुनो नेहा

सुनो म्हणजे ऐकणे व नेहा म्हणजे दृष्टी, उत्तम श्रवण आणि दृष्टी देण्यासाठीचा हा उपक्रम. बऱ्याच लहान मुलांना दृष्टिदोष असतो. काही मुलांना नीट ऐकायला येत नाही. यामुळे विद्यार्थ्यांची ग्रहण क्षमता कमी होते. किंवा एखाद्या गोष्टीचे नीट आकलन होत नाही त्यामुळे हे विद्यार्थी अध्ययनात मागे पडतात. जेव्हा वेगवेगळया गावांमध्ये शाळांमध्ये भेटी दिल्या, वर्गातील अध्ययन अध्यापन प्रक्रिया पाहिली, मुलांचा प्रतिसाद पाहिला, त्यावेळी ही बाबी लक्षात आली, मुलांना फळ्यावरचे नीट दिसत नाही. शिक्षकांनी सांगितलेले नीट ऐकू येत नाही, त्यामुळे मुलं अध्ययनात मागे पडतात. वयाच्या 7 वर्षापर्यंत यावर उपचार झाले नाहीत तर कायमचे अपंगत्व येते. बहिरेपणा किंवा वाचादोष निर्माण होऊ शकतो. या बाबी लक्षात घेऊन या मुलांची तपासणी करून त्यांना आवश्यक सुविधा, साधने देणे, आरोग्य विषयक मदत दिली तर त्या मुलांमध्ये अपेक्षित क्षमता साध्य करता येऊ शकते,ही बाब प्रकर्षाने निदर्शनास आली.

यावर मात करण्यासाठी जिल्हा स्तराहून आरोग्य विभाग आणि शिक्षण विभागाच्या मदतीने त्यातूनच हा उपक्रम आकारास आला.

उपक्रमाची अंमलबजावणी करताना काही उद्दिष्टे व ध्येये ठरवण्यात आली . जिल्ह्यातील सर्व पाच वर्षाखालील मुला मुलींचे या आजारासाठीचे प्राथमिक सर्वेक्षण तीन महिन्यात पूर्ण करणे . या सर्वेक्षणातून निदान झालेल्या सर्व बालकांचे द्वितीय, द्वितीय क श्रेणीतील रुग्णालय व तज्ञांद्वारे निदान व उपचार करणे ,कर्णदोष , दृष्टिदोष निदान झालेल्या सर्व बालकांचे उपचार व योग्यरित्या पुनर्वसन करणे हे ध्येय होते.

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावरील कार्य बल गटाची स्थापना करण्यात आली आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर आठवड्याला नियमित बैठकी घेतल्या व मुंबई येथील कमी दृष्टी तज्ञ डॉ. योगीता गांधी यांच्या उपस्थितीत नांदेड येथे समुपदेशन शिबीर घेण्यात आले. यात एकूण 3790 अंगणवाडी 2756 शाळामधील पाच 53889 बालकांची आरबीएसके तसेच इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या द्वारे कर्णदोष यासाठी प्राथमिक तपासणी करण्यात आली. या प्राथमिक तपासणीनंतर 3980 बालके तज्ञांकडून तपासणी व निदान करून उपचारासाठी पाठविण्यात आली.

तपासणी केलेल्या 749 बालकांचा आळशी डोळा (lazy eye) आढळून आला. त्याचा उपचार करण्यात आला. 356 बालकांना शस्त्रक्रिया द्वारे उपचार देण्यात आले. डोळयात तिरळेपणा

आढळलेल्या 43 बालकांना उपचार दिले. 25 मुलांना मोतीबिंदू  आढळला .  त्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली.  33 मुलांना लो विजन किटस् देऊन त्यांच्या पालकांनाही उपचाराबाबत मुंबई येथील तज्ञाद्वारे नांदेड येथे प्रशिक्षण देण्यात आले.127 जन्मजात हृदयरोग आढळलेल्या बालकांचे शस्त्रक्रिया द्वारे पुनर्वसन  केले. जिल्हा परिषद सेस फंडातून या कार्यक्रमासाठी काही निधी राखीव ठेवण्यात आला आहे. सुनो नेहा नावाचे ॲप तयार करून त्याद्वारे कार्यक्रम राबविण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमासाठी लायन्स क्लबचे पण सहकार्य मिळाले.

लाभार्थी प्रतिक्रिया

‘‘माझ्या मुलीला लहानपणापासूनच डोळ्याची समस्या होती. तिचा एक डोळा उघडतच नव्हता. या उपचारांमुळे तिच्या दृष्टीमध्ये सुधारणा झाली  . याबद्दल मी खुप समाधानी आहे. ‘‘ -कुसुम गायकवाड.

जन्मजात बहिरेपणामुळे माझ्या मुलाला ऐकायला येत नव्हते .त्यामुळे दैनंदिन क्रिया करण्यास सुद्धा त्याला अडचणी व त्रास होत. उपचारानंतर माझे बाळ ऐकू व बोलू शकते ही बाब मला खूपच आनंद देणारी आहे. -गोदावरी कांबळे अर्धापूर.




Abhijeet Ovhal
Maharashtra

# ५ . माझं गाव - सुंदर गाव

गाव स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, स्मार्ट ग्राम, पर्यावरण समृद्धी, निर्मल ग्राम, स्वच्छ भारत मिशन आदी उपक्रम गाव स्तरावर राबवले जातात. या अशा अभियाना नंतर पुन्हा स्वच्छतेच्या बाबतीत उदासिनता आलेली दिसायची. परंतु माझे गाव – सुंदर गाव या अभियानाने गावे कायम स्वच्छ झाली. रस्ते नीटनेटके झाले. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापना पासून ग्रामीण भागातील नागरिकांना उत्तम आरोग्य लाभेल व नीटनेटकेपणाच्या सवयीतून स्वतःच्या जगण्याला शिस्त लागेल यासाठी मा. विभागीय आयुक्तांनी दिलेला माझं गाव सुंदर गाव हा उपक्रम लक्षणीय यशस्वी ठरला.

मुदखेड तालुक्यातील मुगट ग्रामपंचायती पासून या अभियानाला एका भव्य कार्यक्रमाने बहारदार सुरुवात झाली. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, सरपंच, ग्रामसेवक, गटविकास अधिकारी, सर्व कर्मचारी यांच्या वेळोवेळी बैठका घेऊन या अभियानाची प्रसिध्दी करुन महत्त्व पटवून देण्यात आले.

स्वच्छ भारत मिशन, स्मार्ट ग्राम, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, नरेगा आदी योजनेतून संवाद करून गावात उपक्रम घेण्यात आले.

या उपक्रमात हिमायतनगर तालुक्यातील जवळगाव, भोकर तालुक्यातील नारवट, हाडोळी, नागापूर, खडकी, हदगाव तालुक्यातील साप्ती, पिंपळगाव यास आदी गावांमधून माझा गाव सुंदर गाव उपक्रमातून गावांचा कायापालट झाला.

ग्रामीण भागात गावाची संपूर्ण स्वच्छता, सार्वजनिक जागा, वैयक्तिक घरे, इमारती बाहेरचा परिसर, धार्मिक स्थळे, स्मशानभूमी, दफनभूमी, गावाच्या प्रवेशद्वारावर, रस्त्यावरील, गावाच्या बाह्य परिक्रमेतील गावातील सार्वजनिक जागा, गल्लीबोळातील उकिरडे, जनावरांचे गोठे स्वच्छ करणे, रस्त्यावर जनावर न बांधणे, गावातील कचरा गाडीने जमा करून प्रक्रिया करणे, सर्व शौचालयांचा वापर, सार्वजनिक ठिकाणी कचराकुंड्यांची व्यवस्था, सांडपाण्यावर प्रक्रिया, गावात लोकसंख्येच्या प्रमाणात वृक्ष लागवड, निरुपयोगी वेड्या बाभळीची छाटणी करून रस्ते सुलभ करणे सार्वजनिक जागावर औषधी वनस्पतींची लागवड, नागरिकांसाठी उद्यान, गावाचे ऐतिहासिक, भौगोलिक महत्व सांगणारी माहिती फलक लावणे,

ग्रामपंचायतीचे सर्व अभिलेखे अद्यावत करणे आणि ते सहा बंडलनुसार लावणे, गावात व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे, अल्पवयीन मुलींचे बालविवाह थांबविणे, यासाठी पालकांची मनोभूमिका तयार करणे, गावाचे हद्दीत वन्य जीव प्राण्यांसाठी पाणवठे तयार करणे, ग्रामीण जनतेत आरोग्याविषयी गैरसमज, जुन्या समजूती यावर जनजागृती करणे, व्याख्यान ठेवणे, किशोरवयीन मुलींना समुपदेशन करणे, आरोग्य विषयक चांगल्या सवयी लावणे, सर्व रोग निदान शिबिरे आयोजित करणे आदी अनेक कार्यक्रम देण्यात आले.

साप्ती गावाने संपूर्ण गावाला एकच रंग दिल्याने गावाला एकीचे बळ प्राप्त झाले आहे. हे गाव जिल्ह्यातील गुलाबी गाव म्हणून नावारूपाला आले आहे. हाडोळी येथे प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी सेग्रिकेशन सेंटर, जवळगाव येथे कचरा उचलण्यासाठी ई-रिक्षा, मीयावाकी घनदाट वृक्ष लागवड, वृद्धांना बसण्यासाठी बेंच, मुलांसाठी गार्डन, ऑक्सिजन पार्क, अनेक गावात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी वैयक्तिक व सार्वजनिक शोषखड्डे, स्तरीकरण तळे, घनकचरा व्यवस्थापनासाठी कंपोस्ट खत खड्डा, प्लास्टिक सेग्रीकेशन सेंटर, कुटुंब स्तरावर ओला कचरा - सुका कचरा विलगीकरणासाठी स्वतंत्र कचरा पेट्या ठेवण्यात आल्या. सर्व घरांवर मुलींच्या नामनिर्देशक पाट्या लावण्यात आल्या. रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड. शाळा, अंगणवाडी व ग्राम पंचायत आयएसओ करण्यात आल्या आहेत.

हाडोळी येथे ग्रामपंचायतीची १०० % घरपट्टी व नळपट्टी भरणा-याना पिठाच्या चक्कीचे दळण मोफत दिले जाते व गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे वाटर फिल्टर द्वारे वीस लिटर शुद्ध पाणी दिले जाते.

या गावांमधून गावातील गावकरी आपला परिसर दररोज सकाळी आणि संध्याकाळी झाडून स्वच्छ निर्मळ करतात. सर्वांच्या घरापुढे सुशोभीत रांगोळी काढतात. हे सुंदर माझे गाव या अभियानाचे फलित गावातून दिसून येते.







# ६ माझी मुलगी माझा अभिमान

नांदेड जिल्हा परिषद कायमच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यामध्ये अग्रेसर असते. याच नावीन्यपूर्ण उपक्रमांचा वसा घेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अभिनव संकल्पनेतून  महिला व मुलींच्या सक्षमीकरणाला अधिक बळकटी देण्यासाठी माझी मुलगी माझा अभिमान हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे.

मुलगी हे परक्याचे धन तर मुलगा हा वंशाचा दिवा ह्या समाजात असलेल्या पुरुषप्रधान मानसिकतेला छेद देण्यासाठी, मुलगी सुद्धा घराचा एक अविभाज्य घटक आहे, घराच्या निर्णय प्रक्रियेमध्ये तिचा तितकाच महत्त्वपूर्ण सहभाग आहे, मुलींच्या विकासाला, प्रगतीला मुलांच्या विकासाएवढीच घरातून मिळणारी साथ आहे. ह्या बाबी अधोरेखित करण्यासाठी मुलीच्या नावाची नामनिर्देशक  पाटी घरावर लावणे हा आगळावेगळा  उपक्रम सुरुवात करण्यात आला.

सदर योजनेची तळागाळापर्यंत प्रचार व प्रसिद्धी व्हावी यासाठी जिल्हा परिषद प्रशासनामार्फत जिल्ह्याचे मा.पालकमंत्री, सर्व सन्माननीय खासदार , सर्व सन्माननीय आमदार, सर्व सन्माननीय जिल्हा परिषद पदाधिकारी, सर्व सन्माननीय जिल्हा परिषद सदस्य, सर्व प्रशासकीय अधिकारी यांना मुलींच्या नावाच्या पाट्यांचे वितरण करून सदर लोकचळवळीला सुरुवात करण्यात आली. जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचारी यांनीसुद्धा आपल्या घरावर मुलींच्या नावाच्या नामनिर्देशक पाट्या लावल्या. या उपक्रमाचा आदर्श घेत अनेक गावांनी

लोकसहभागातून मुलींच्या नावाच्या नामनिर्देशक  पाट्या लावत पूर्ण गावाच्या गावे यामध्ये उस्फूर्तपणे सहभागी झाली आहेत. हा उपक्रम आता एक प्रशासकीय कार्यक्रम न राहता लोकांचा कार्यक्रम होऊन होऊन एका लोकचळवळीच्या रूपात गावोगाव राबवला जात आहे.

या लोकचळवळीचा  परिणाम स्वरूप नांदेड जिल्ह्यातील एकूण 688 गावात 202824 घरांवर मुलींच्या नावाच्या पाट्या घरावर लावण्यात आल्या आहेत तर 150 गावात हे काम प्रगतीपथावर आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत हा उपक्रम सर्व गावांमध्ये राबवण्याचा ठराव घेण्यात आला.

सदर उपक्रमाचे फलित म्हणजे लोकांमध्ये सदर उपक्रमाच्या माध्यमातून लोकांच्या मानसिकतेत हळूहळू सकारात्मक बदल दिसून येत आहे त्यामध्ये पालक मुलींच्या उच्च शिक्षणामध्ये गुंतवणूक करण्यात पुढे येत आहेत, तर मुलींचे शाळेमधील गळतीचे प्रमाण हे जवळजवळ नगण्य झाल्याचे दिसून येत आहे.

तसेच नविनतम आकडेवारीनुसार नांदेड जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर हे 1000 पेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे जे की यापूर्वी 888 असे होते.

या उपक्रमाचे एक फलित म्हणून असेही दिसून येते की जिल्हा गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालानुसार महिला व मुलींबाबत होणाऱ्या घरगुती हिंसाचार व बालविवाहाचे प्रमाण यामध्येसुद्धा लक्षणीय प्रमाणात घट झाल्याचे निदर्शनास येत आहे.

समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये मुलींचा व महिलांचा असणारा सहभाग यामध्ये लक्षणीय प्रमाणामध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे.समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या मुली व महिला आत्मविश्वास पूर्वक वावरत असल्याचे दिसून येत आहे. या उपक्रमाला राजकीय इच्छाशक्तीचे सुद्धा समर्थन मिळाल्यामुळे हा उपक्रम जनमाणसात चांगल्या प्रकारे राबवला जात आहे व त्याच्या शाश्वततेची एक खात्री निर्माण झाली आहे.

नांदेड जिल्हा परिषदेला भेट दिलेल्या विधिमंडळाच्या पंचायत राज समिती, विमुक्त जाती व भटक्या जमाती समिती, अनुसूचित जाती व जमाती आयोग यांनीसुद्धा सदर उपक्रमाचे कौतुक करून जिल्हा परिषदेच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आहे.

राज्यस्तरावर होणाऱ्या वेगवेगळया बैठका व परिषदा यांच्या माध्यमातूनसुद्धा या उपक्रमाचे कौतुक झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी विभागीय स्तरावर झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत या उपक्रमाचे कौतुक केले आहे.


तत्कालीन मा. महसूल व ग्रामविकास राज्यमंत्री व सध्याचे कृषीमंत्री मा. ना. अब्दुलजी सत्तार साहेब व राज्याचे ग्रामविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मा. राजेश कुमार साहेब यांनी सुध्दा सदर उपक्रमाचे कौतुक केले.

"आपल्या जिल्हा परिषद नांदेड तर्फे राबविलेला **माझी मुलगी माझा अभिमान** हा अतिशय स्तुत्य उपक्रम असुन वाखानण्याजोगा आहे. आपले अभिनंदन !"

- मा. आमदार किशोर जोरगेवार ( विद्यमान आमदार तथा पंचायत राज समिती सदस्य )

प्रतिक्रिया:

माझी मुलगी माझा अभिमान या उपक्रमात आम्ही आमच्या घरावर स्वताच्या नावाची पाटी लावलेली पाहून आम्हाला अभिमान वाटत आहे. आमचा आत्मविश्वास वाढला आहे. हे घर सुध्दा माझे आहे याची जाणीव झाली. - : प्रगती नवते ( १२ वी विद्यार्थिनी , पिंपळगाव – हदगाव)




छाया महेश होकर्णे


साधना
निवास
सौ.साधना गिरीशजी महाजन
सौ.श्रेया अक्षय गुजर

# ७ आई बाबांची शाळा

कोरोना काळात सर्व व्यवहार ठप्प झाले होते .शाळा बंद होत्या .शिक्षणाची आबाळ होती .अशा स्थितीत इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांचे मूलभूत शिक्षण झाले नाही तर पुढे त्याला काहीही येणार नाही ,ही बाब लक्षात घेऊन जिल्हास्तरावर एका कार्यगटाची निर्मिती केली. या कार्यगटाने यावर चिंतन करून आई-बाबांची शाळा हा नवा उपक्रम दिला. आई बाबांची शाळा ते 2022 -23 या वर्षातील निपुण भारत अंतर्गत माता गटांच्या मार्फत विद्यार्थ्यांचे शिक्षण घेण्यात आले.

मुलांना इयत्ता पहिली व दुसरीच्या अभ्यासक्रमाची ओळख करून देणे ,त्यांचा अभ्यास घेणे यासाठी पालकांचा सहभाग घेण्याचे ठरवले. पालकांची टप्प्याटप्प्याने झूम ऍप द्वारे मीटिंग घेतली. ऑनलाईन लिंक वर त्यांच्या इच्छेनुसार नोंद करण्यास सांगितले. 70 हजार पालकांनी अशा नोंदी केल्या आणि त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करून घेतले .त्यांचा अभ्यास कसा घ्यायचा या संदर्भ पुस्तिका तयार करून त्यांना देण्यात आली. अत्यंत अनौपचारिक पद्धतीने हे वर्ग विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार स्वतःच्याच घरात भरू लागले.

पालक काय शिकवत आहेत, मुलांना काय आले आहे, काय येत आहे याची चाचपणी करण्यासाठी सर्व विषयतज्ज्ञ विषय शिक्षक ,पर्यवेक्षकीय अधिकारी, गावागावात फिरून पाहणी करत त्याचे अहवाल व्हाट्सअप ग्रुपवर समाज माध्यमावर सादर करीत पहिल्यांदा हा प्रयोग प्रत्येक तालुक्यातील 2 शाळांमध्ये याप्रमाणे करण्यात आला. नंतर ही व्याप्ती वाढवून सर्व जिल्हा परिषद शाळा आणि महिनाभरानंतर सर्व जिल्हा परिषदेने खाजगी शाळांमधून याला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

आपण पाल्यांचा अभ्यास घेऊ शकतो हा आत्मविश्वास पालकांत निर्माण झाला. दर आठवड्याच्या सोमवार आणि गुरुवारी पालकांना उपलब्ध असलेल्या सवडीचे वेळानुसार प्रथम भाषा, मराठी आणि गणित विषयाच्या कृती समजून सांगण्यात आल्या. पालकांनी सोमवार ते बुधवार प्रथम भाषा मराठीचा आणि गुरुवार ते शनिवार गणित विषयाचा अभ्यास घेतला.

पालक प्रशिक्षणात समजून घेतलेल्या कृतीचा आवश्यक तेथे शिक्षकांच्या मदतीने अभ्यास घेतला. दर शनिवारी संध्याकाळी या पालकांना व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून गुगल फॉर्म आणि पीडीएफ द्वारे साप्ताहिक चाचणी देण्यात आली होती. पालकांनी आपल्या पाल्यांकडून सोडवून घेतली.

आई बाबाच्या या शाळांमुळे प्रथम भाषा मराठीमध्ये 1.76 टक्के व गणित विषयात 5.36% संपादणूक वाढ झाली .जिल्हास्तरावर सार्वत्रिक सर्वव्यापी अंमलबजावणीमुळे तीन महिन्याच्या उपक्रमात ऑनलाईन व ऑफलाइन माध्यमातून 70 हजार विद्यार्थ्यांच्या पालकांनी सहभाग घेतला.

भारत सरकारच्या निपुण भारत प्रकल्पांतर्गत इयत्ता पहिलीत येणाऱ्या मुलांसाठी पहिले पाऊल शाळा पूर्वतयारी अभियान हा उपक्रम राबविण्यात आला. मुलांच्या शाळा पूर्वतयारीसाठी एप्रिल 2022 व जून 2022 मध्ये मेळावे आयोजित करण्यात आले. या दोन मेळाव्यांदरम्यान वाडीवस्तीवर माता पालकांचे गट तयार करून साहित्य पुरविले आणि मार्गदर्शन केले गेले. शासन निर्णय 27 ऑक्टोबर 20 -21 च्या अनुषंगाने इयत्ता तिसरीपर्यंत पायाभूत लेखन वाचन व गणितीय कौशल्य प्राप्त करण्याबाबत प्राथमिक पातळीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माता पालक गटातून लीडर मातेची नियुक्ती करण्यात आली. प्रत्येक वाडी वस्तीवर एक माता गट आणि गटासाठी लीडर माता ही रचना तयार केली. वैयक्तिक लिंक देण्यात आली त्यामध्ये सर्व अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक यांनी अपलोड करावयाचे होते माता पालक गटाची बांधणी करण्यासाठी वेगळी लिंग देण्यात आली होती त्यामध्ये माता व विद्यार्थी यांनी लिंक अपलोड करावयाची होती. प्रत्येक वाडी वस्तीवर एक माता गट आणि गटासाठी लीडर माता ही रचना केलेली आहे सुरुवातीला गावातील वस्तीतील माता गटांसोबत सुरुवातीला एक बैठक घेऊन पुढचे वर्षभर राज्यस्तरावरून शिक्षकांना ऑनलाइन साहित्य पुरविण्यात येत आहे.

आठवड्याला आयडियल व्हिडिओ अथवा कार्ड माता गटांना पुरवणे आणि त्याबद्दल त्यांना मार्गदर्शन करणे, शिक्षक ,सर्व लीडर माता सोबत संपर्कात राहतात आणि आठवड्याला एक व्हिडिओ अथवा कार्ड कसे वापरायचे याबाबत मार्गदर्शन करतात. सर्व मातांना मातांचे गट आपापल्या स्तरावर बैठका घेऊन सांगितल्याप्रमाणे घरी आपल्या मुलांना आयडिया व्हिडिओ दाखवून कृती करून दाखवतात .शिक्षक याबद्दल मातांकडून फीडबॅक घेत राहतात. दर आठवड्याला एक प्रमाणे या आठवड्यात 20 व्हिडिओ तयार करण्यात आले आहेत .इंग्रजी हिंदी उर्दू मराठी या भाषेत video आहेत .

अपेक्षित गट 37652 उघडलेले गट 1800. समाविष्ट विद्यार्थी 42349

इयत्ता पहिली ते तिसरीची विद्यार्थी 57502

इयत्ता पहिली ते तिसरीची पटसंख्या १, ८८२६० आणि इयत्ता पहिली ते तिसरीचे विद्यार्थी 57502

इंग्रजी शाळांमधून जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश.

जिल्ह्यात सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनांच्या एकूण 3739 शाळा आहेत .यापैकी 2197 शाळा जिल्हा परिषदेअंतर्गत चालतात. या  शाळा दोन शिक्षकी, बहुशिक्षकी, प्राथमिक, उच्च प्राथमिक ,माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आहेत .गेल्या काही वर्षात इंग्रजी शाळा मोठ्या प्रमाणावर सुरू होऊ लागल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर मराठी शाळांमधून विद्यार्थी इंग्रजी शाळांमध्ये जाऊ लागले होते.

ही स्पर्धा तीव्र होत असतानाच जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांनी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. मुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी गुणवत्तेचे प्रकल्प घेतले. हे भरारी व सी आर टी च्या माध्यमातून अनेक उपक्रम घेतले. जिल्हाभर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले . गणिती क्रिया, सामान्य ज्ञान, जीवन विषयक कौशल्याचे ज्ञान ,अशा अनेक पातळयावर मुलांचे अध्ययन अध्यापन होऊ लागले.

शाळा बंद झाल्या यामुळे शिक्षण पद्धती प्रक्रिया थांबेल की काय, अशी भीती निर्माण झाली होती. अशाही प्रतिकूल अवस्थेत जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी ऑनलाइन शिक्षण चालू ठेवले. ऑफलाइन पद्धतीने मुलांना गृहपाठ देणे ,चाचण्या घेणे, गृहभेटी देऊन मुलांमध्ये मिसळणे , या बाबी चालू राहिल्या .शिष्यवृत्तीचे नियमित वर्ग घेऊ लागले .जिल्ह्यातील डिजिटल शाळांमधून विज्ञान प्रयोगशाळांमधून शाळा ग्रंथालयांमधून विद्यार्थ्यांचे विकसन होऊ लागले. या बाबीचा परिणाम विद्यार्थी इंग्रजी शाळांमधून मराठी शाळेत विद्यार्थी होण्यावर झाला .माझ्याच गावात मराठी शाळा जर उत्तम शिक्षण देत असेल तर इतर गावातील इंग्रजी शाळेत विद्यार्थ्यांना का पाठवावं, असा सवाल पालक करू लागले आणि इंग्रजी शाळांमधून आणि खाजगी मराठी शाळांमधून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी येऊ लागले. विद्यार्थ्यांचेही आगमन खाजगी शाळांना आवडणारे नव्हते यातून विद्यार्थ्यांना टीसी न देणे, प्रवेश देण्यासाठी मदत न करणे अशा बाबी लक्षात आल्यानंतर याप्रकरणी स्वतः मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी लक्ष घालून अशा  2100 विद्यार्थ्यांना मराठी शाळांमध्ये जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांमध्ये प्रवेशित केले आहे.





# ८ नांदेड – ग्रामीण पर्यटन

नांदेड जिल्ह्याला एक वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक ऐतिहासिक व सामाजिक वारसा लाभलेला आहे.जिल्ह्याला स्वतःचे असे व्यक्तिमत्व आहे. मुळात महाराष्ट्र व तेलंगणाला संपन्न करणाऱ्या गोदावरीच्या नाभीस्थानास वसलेला हा जिल्हा गोदावरीच्या प्रवाहामुळे उत्तर व दक्षिण अशा दोन भागात विभागलेला आहे. नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान हे महाराष्ट्रातील मराठवाडा विदर्भ, तेलंगणा आणि कर्नाटक यांच्या सीमारेषेवर आहे.


गोदावरीच्या काठावर वसलेले आणि जिल्ह्याला पौराणिक वारसा सुद्धा आहे.  प्राचीन व मध्ययुगीन काळात सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट ,गोंड  इत्यादी घराण्याचा या क्षेत्राशी संबंध आलेला आहे.  या परिसरात विविध गुरुद्वारे पाहाव्यास मिळतात. नव्हे ते नांदेडची ओळखच बनले आहेत.


गुरु गोविंदसिंगजींचा  गुरुद्वारा, माहूरची रेणुकादेवी, देगलूरमधील होट्टल, माळेगाव यात्रा, कंधारचा भुईप्रतिक्रिया किल्ला, विष्णुपुरी बंधारा या अलीकडच्या काळातील ओळखी सामान्यांना माहिती आहेत, परंतु नांदेडचे अनेक ऐतिहासिक सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ आजही पडद्याआड आहेत. पुरातन मंदिरे, अनेक वास्तुशिल्प, आदिवासी भागातील कलावैभव, नृत्य संगीत  नाटक परंपरा, धार्मिक सलोखा असलेली ठिकाणे या सर्व बाबींनी हा  जिल्हा समृद्ध आहे.

जिल्ह्यात अशी अनेक ठिकाणी आहेत जी फार प्रसिद्धीच्या झोतात आलेली नाहीत अशा स्थळांचा शोध घेण्यासाठी गाव स्तरावरील सरपंच, ग्रामसेवक यांना आवाहन करण्यात आले आणि त्यांच्याकडून अशा स्थळांची माहिती जमा करण्यात आली. स्थानिक शिक्षक इतिहासाचे तज्ञ आणि शिक्षकांच्या माध्यमातून या माहितीचे दस्तऐवजीकरण तपासून पुस्तिका तयार करण्यासाठी अंतिम प्रत तयार करण्यात आली.

जिल्ह्यातील या सर्व सांस्कृतिक स्थळांची व संचितांची जनसामान्यांना ओळख व्हावी आणि त्यातून ग्रामीण पर्यटनास चालना मिळावी यासाठी 'नांदेड सांस्कृतिक ऐतिहासिक', हे नांदेड जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळे ,प्राचीन मंदिरे व  सांस्कृतिक परंपरांची ओळख करून देणारे सचित्र पुस्तक (कॉफी टेबल बुक)  जिल्हा परिषदेच्यावतीने मराठवाडा मुक्ति संग्राम दिनी 17 सप्टेंबर 2022 रोजी प्रकाशित करण्यात आले.

ही पुस्तिका संदर्भ ग्रंथ संशोधक अभ्यासक आणि ग्रामीण पर्यटनास चालना देण्यासाठी उपयुक्त ठरणारी आहे,  यात ग्रामीण पर्यटनासाठी जिल्हा परिषदेच्या स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे.



अंतरंग

अर्धापूर
अपरंपार मंदिर, पाटनूर / ८
दर्गा असहाने रसूल, अर्धापूर / १०
ओंकारेश्वर महादेव मंदिर, गणपूर / १२
केशवराज मंदिर, अर्धापूर / १४
भवानी मंदिर, चेनापूर / १६
महादेव मंदिर, पिंपळगाव / १७
नाट्यपरंपरा, शेलगाव / १८

भोकर
सीताखांडी, भोकर / २०
गणेश मंदिर, पाळज / २२

बिलोली
शिवलिंग बादशहा मंदिर, रामतीर्थ / २३
कुंडलेश्वर मंदिर, कुंडलवाडी / २४
जामा मस्जीद, बिलोली / २६
नृसिंह मंदिर, राहेर / २८
लक्ष्मीनृसिंह मंदिर, बेळकोणी (बु.) / ३०
महादेव मंदिर, आदमपूर / ३२

देगलूर
महादेव मंदिर, करडखेड / ३४
महादेव मंदिर, खानापूर / ३६
संत गुंडा महाराज मठ / ३८
नृसिंह मंदिर, शेळगाव / ३९
महादेव काठी, शिळवणी / ४०
वीरभद्र मंदिर, दावणगीर / ४१
रामलिंग मंदिर, रामपूर / ४२
होट्टल / ४४

धर्माबाद
महादेव मंदिर, येवती / ४६
संगमेश्वर मंदिर, संगम / ४८

हदगाव
अडीच लिंगेश्वर मंदिर, शिवदरा / ५०
केदारनाथ महादेव मंदिर, केदारगुडा / ५२
बारलिंग देवस्थान, तामसा / ५४
शिकर लेणी / ५६

हिमायतनगर
कालिकादेवी, हिमायतनगर (वाढोणा) / ५८
परमेश्वर मंदिर, हिमायतनगर (वाढोणा) / ६०
जगदंबा (भवानी मंदिर), जवळगाव / ६२

कंधार
सटवाई मंदिर, दिग्रस (बु.) / ६३
जगी महाराज मंदिर, घोडज / ६४
संत नामदेव महाराज मठ संस्थान, उमरज / ६५
कृष्णागड, कंधार / ६६
जगतुंग समुद्र, कंधार / ६९
परमेश्वर देवस्थान, शिराढोण / ७०
शंभूकडा, पागदरा / ७२
शंभू महादेव मंदिर, बोरी (बु.) / ७३
पांडवदरा, गोणशी / ७४
हाजी सय्याह दर्गा / ७६

# ९ वॉर रूम

मा. अतिरिक्त मुख्य सचिव ग्रामविकास मा. राजेशकुमार साहेब यांच्या संकल्पनेतून कोणतीही संकल्पना  तळागाळापर्यंत पोहोचायची  असेल तर त्यासाठी सूत्रबद्ध नियोजन व्यवस्थित आखणी आणि उपक्रम दिशा निश्चित करणे आवश्यक असते.

उपक्रमाची अंमलबजावणी होताना त्यातील सातत्य टिकून ठेवण्यासाठी वारंवार बैठका, सूचना, पाठपुरावा करणे आणि काम पूर्ण होईपर्यंत त्यावर लक्ष ठेवणे आवश्यक असते. यासाठी जिल्हा परिषदेमध्ये वॉर रूमची आवश्यकता होती. अशा पद्धतीची सर्व यंत्रणांनी सुसज्ज असलेली वॉँर रूम तयार करण्यात आली आहे.

सुयोग्य पद्धतीने संवाद साधता यावा या उद्देशाने वॉर रूमची निर्मिती करण्याचे ठरले. यासाठी नावीन्यपूर्ण योजनेत जिल्हा नियोजन समितीमध्ये प्रस्ताव देण्यात आला. यासाठी 29 लक्ष 86 हजार रुपये निधीची तरतूद देण्यात आली. यामधून जिल्हा परिषद कॉन्फरन्स हॉलचे नुतनीकरण, राऊंड टेबल, खुर्च्या, 85 इंची स्मार्ट टीव्ही, संवादासाठी माईक, लाईट व साऊंडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच जिल्ह्यातील 16 पंचायत समितीमध्ये 32 इंची टीव्हीची देण्यात आला. त्यामुळे संवाद साधण्यासाठी सोयीचे झाले. अशा पद्धतीने सर्व यंत्रणांनी सुसज्ज असलेली वॉर रूम तयार करण्यात आली. यात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. वेळोवेळी होणाऱ्या झुम बैठका, YouTube लाईव्ह, संपर्क सत्रासाठी या सभागृहाचा अत्यंत योग्यतेने वापर करण्यात येत आहे.

विशेषता कोरोना कालावधीमध्ये एकमेकांशी संपर्कात राहणे शक्य नसताना वॉर रूमच्या माध्यमातून जिल्हा स्तरापासून गाव स्तरापर्यंत सर्वजण एकमेकांच्या संपर्कात राहून काम करू शकले ही मुख्य उपलब्धी आहे.

जिल्हा परिषदेतील वॉर रूम मुळे केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंलबजावणीसाठी राज्य शासन, मा. विभागीय आयुक्त कार्यालय , गटविकास अधिकारी कार्यालय यांच्याशी केंव्हाही सुसंवाद साधुन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी  वॉर रूमचा अत्यंत उपयोग होत आहे.

:- डॉ.  संजय तुबाकले  ( प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड)



# १० शाळेबाहेरची शाळा

कामासाठी मोठ्या प्रमाणावर पालकांची  शहरी भागात स्थलांतर होते.  या मुळे  मुलांचे  शिक्षण स्थलांतरित  ठिकाणी होताना दिसून येत नाही. त्यामुळे हे पालक जेव्हा घरी परत येतात तेव्हा  अपेक्षित असलेल्या क्षमता पूर्ण झालेल्या नसतात .किंबहुना या विद्यार्थ्यंची शाळेतून गळती होते. नांदेड शहरालगत ही अशाच प्रकारे स्थलांतरित होऊन येणाऱ्या पालकांची संख्या मोठी आहे .शहराच्या जवळ गोदावरी नदीच्या काठावर जवळपास 60 वीटभट्या आहेत. या परिसरात शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बालकांसाठी शाळेबाहेरची शाळा सुरू करण्याचा विचार केला. जिल्हा परिषद, नांदेड आणि जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, नांदेड च्या मदतीने  हा प्रयोग सुरु करण्यात आला. यात आता 48 मुले शिकत आहेत.

शाळाबाह्य अनियमित स्थलांतरित बालकामगार मुलांचा सर्वेक्षणाद्वारे शोध घेण्यात आला. यांना नियमित शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि टिकून ठेवून  शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. प्रचलित शिक्षण पद्धतीपेक्षा शिक्षणाचा वेगळा विचार मांडणारी शाळा म्हणून हे मॉडेल विकसित करण्यात आले आहे.  राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ( NEP2020) नावीन्यपूर्ण अध्यापनशास्त्र, खेळणी आधारित शिक्षण ,21 व्या शतकातील शैक्षणिक कौशल्य विकास, कृतीतून व जीवनानुभवातून शिक्षण , सहभाग, गीतातून शिक्षण, हंगामी स्थलांतरित वीट भट्टी कामगारांच्या मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाळे बाहेरची  शाळा सुरू करण्यात आली आहे.

ही शाळा विविध  वीटभट्ट्यांच्या  परिसरात गोदावरी काठावर एका मैदानी भागात भरवण्यात येते . पालकांचा विश्वास व मानसिकता तयार करणे गरजेचे होते .विद्यार्थ्यांना नियमित शाळेत आणणे टिकवून ठेवणे, शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचे मोठे आव्हान मोठे होते. विद्यार्थ्यांना कृतियुक्त खेळ आधारित सहज शिक्षणातून शिकते करण्याचे मोठे आव्हान होते. शाळेची कार्यपद्धती बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क, शाळाबाह्य ,अनियमित, स्थलांतरित बालकामगार मुलांच्या बाबतीत आपण जपला पाहिजे. त्याचे संवर्धन केले पाहिजे या विचाराने कृतिशील बालरक्षक अधिकारी, शिक्षक यांनी एकत्रित येऊन *बदलाव हम लायेंगे* ग्रुप , बी एच एल ग्रुप स्वतःसाठी प्रेरणादायी ब्रीद निर्धारित करून  1

नोव्हेंबर 2022 पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली.  सर्वेक्षणाची पहिली सभा प्रत्यक्ष साइटवर घेण्यात आली .

वीट भट्टी कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवण्यासाठी हा विचार कृतिशील शिक्षक आणि गटसाधन  केंद्र नांदेड येथील सर्व विषय साधन व्यक्ती, समावेशित विषय तज्ज्ञ, फिरते विशेष शिक्षक यांची पहिली सभा दिनांक 2 नोव्हेंबर 2022 रोजी प्रत्यक्ष धनेगाव साइटवर घेतली .यात वीट भट्टी कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा सर्वे त्यांना नजीकच्या शाळेत प्रवेश करणे .यासोबत मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी स्वयंशिक्षणाची व्यवस्था करणे हा मनोदय यात व्यक्त झाला. दिनांक 3 ते 5 नोव्हेंबर 20 22 या काळात जवळपास 30-40 एकर परिसरात पसरलेल्या वीटभट्यांत काम करणाऱ्या कुटुंबांचे सर्वेक्षण केले .या तीन दिवसात 3 ते 18 गटातील शाळाबाह्य, अनियमित, स्थलांतरित विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला. विविध वीट भट्ट्या कारखानदार ,बाळगीर पंचमगीर महाराज माजी जिल्हा परिषद सदस्य  त्यांनी शेतातील जागा त्यासाठी दिली. ट्रॅक्टरने त्या जागेची स्वच्छता व सपाटीकरण करून नांदेड तालुक्यातील विषय साधनव्यक्ती, समावेशित विषय त तज्ज्ञ , फिरते विशेष शिक्षक काही शिक्षकांच्या सहभागातून ही शाळा सुरू केली.




भाज्या

# ११ मियावाकी घनदाट वृक्ष

पर्यावरण समृद्धीसाठी वृक्ष लागवड हा विषय महत्त्वाचा आहे. त्यासाठी घेऊन वृक्ष लागवड केली जाते. स्थानिक झाड लावण्याच्या अनेक पद्धती आहेत बहुसंख्य पद्धतीत झाडे वाढायला 25 ते 30 वर्षे लागतात.  कमी वेळात, कमी पाण्यात, कमी काळात काळजी घेऊन आमच्या हयातीत एक जंगल वाढेललं बघता येईल अशी ही मियावाकी पद्धत आहे.

मियावाकी या जपानी पद्धतीमध्ये अतिशय कमी जागेत जास्तीत जास्त झाडांची शाश्वत वाढ केली जाते. या जंगल निर्मितीमध्ये  स्थानिक वृक्षांना स्थान आहे. आपल्या परिसरात वाढणारा हिरडा, बेहडा, बेल, आवळा, बोर, गावठी आंबे, जांभूळ, अर्जुन, पळस, चिंच  आदी. वृक्ष लागवड केली जाते.

या मियावाकी पद्धतीने वृक्ष लागवड करण्याचा उपक्रम जिल्हा परिषदच्या वतीने हाती घेण्यात आला. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, मैदान असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा, पंचायत समिती येथे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. उपक्रम हाती घेताना लोक सहभाग घेण्यात आला. प्रार्थमिक आरोग्य केंद्र, मोठ्या ग्रामपंचायती, पंचायत समिती मोकळ्या शासकीय जागेत घनदाट वृक्ष लागवडीचे 288 प्लांट पूर्ण करण्यात आले ज्यामधून 35 हजार पक्षांची लागवड करण्यात आली तसेच 44 हजार 35 मोहगणीची लागवड केली गेली आहे. ही झाडं जगवण्यासाठी वृक्षांना पाणी देण्यासाठी नरेगांमधून मजूर लावण्यात आले. सदर मोहीम जिल्ह्यात गतिमान करण्यासाठी अधिकारी-कर्मचारी यांच्या बैठका घेऊन मियावाकी वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून देण्यात आले. प्रत्यक्ष लागवडीसाठीची जागा निश्चिती करण्यात आली. या उपक्रमात वृक्ष घनदाट होतील का? हा प्रश्न होता. परंतु खरोखर घनदाट आणि झपाट्याने वृक्षांची वाढ झाल्यामुळे सर्वांची खात्री पटली. सर्व ठिकाणी करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. त्यानंतर अनेक ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन त्यांनी देखील त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये घनदाट मीयावकी पद्धतीने वृक्ष लागवडीला सुरुवात केलेली आहे.  हे या मोहिमेचे फलित आहे.


माझी वसुंधरा अभियान 2.0
MY EARTH
अंतर्गत
आनंदवन घनवन
वृक्ष लागवड (मियावाकी)
3300 झाडे
कॅनोपी CANOPY 585 झाडे
वृक्ष TREE 1950 झाडे
उपवृक्ष SUB TREE 975 झाडे
झुडूप SHURB 390 झाडे
ग्रामपंचायत कार्यालय, जवळगाव ता.हिमायतनगर जि.नांदेड
OPPO F19
2022/04/12 17:38


GPS Map Camera
Mali
Nigeria
Google
Jawalgaon, Maharashtra, India
9QQM+WGJ, Jawalgaon, Maharashtra 431802, India
Lat 19.389402°
Long 77.784364°
31/03/22 02:18 PM

# १२ एकाच दिवशी जलपूजन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत जिल्ह्यात एकाच दिवसात 75 विहिरींचे जलपूजन केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, जमाती या प्रवर्गातील लाभार्थ्यांना नवीन विहीर आणि वीज जोडणी, विद्युत पंप संच ,तुषार संच, ठिबक संच या स्वरूपात रक्कम रुपये 3,30,00/ पर्यंत लाभ देण्यात येतो .

शेतकऱ्यांना  लाभ देण्यापूर्वी पाणी उपलब्ध नसल्यामुळे कोरडवाहू स्वरूपात शेतीची पिके घ्यावी लागत. त्यामुळे मिळणारे उत्पन्नही कमी होते .नैसर्गिक पर्जन्यमानाचा असमतोल असेल तर शेतकऱ्यास आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागते .त्यामुळे रोजगारासाठी स्थलांतर होण्याचे प्रमाण ही मोठ्या प्रमाणात होते. यातूनच अनेक शेतकरी, शेतमजूर यांना निराशा यायची.

अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून जीवनमान उंचावण्यासाठी अशा शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची ही महत्त्वाची योजना आहे .शेतकऱ्यांना मोहीम स्वरूपात तालुकास्तरावर बैठका घेऊन या योजनेबद्दल माहिती दिली. लाभार्थ्यांपर्यंत पोच केली. महाडीबीटी पोर्टलवर लाभार्थ्यांनी सादर केलेले अर्ज तपासून बैठकीमध्ये वेळोवेळी मार्गदर्शन करून लाभार्थ्यांना प्रवाहामध्ये आणले. केलेल्या कामाची तालुका निहाय पीएफएमएस प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात येऊ लागली.

मराठवाडा मुक्ति संग्राम अमृत महोत्सवी वर्षाच्या औचित्याने  जिल्हा परिषद कृषी विभागाच्या मार्फत 15 नोव्हेंबर 2022 एकाच दिवशी जिल्ह्यातील 75 विहिरींचे जलपूजन करून विहिरीच्या कामात सुरुवात करण्यात आली. लोहगाव येथील लाभार्थी मोतीराम पिराजी तोटावाड यांच्या शिवारात विहिरीचे जलपूजन केले. अभिसरण पद्धतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत लाभार्थ्याला फळबाग लागवड करण्याचे सांगितले.

बालाजी रघुनाथ सूर्यवंशी हा मरखेल ता.  देगलूर तालुक्यातील रहिवाशी. यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचा लाभ मिळाल्यामुळे सिंचन क्षमता वाढली असून फळबाग लागवड करण्याचे नियोजन करीत असल्याचे त्यांनी सांगितले. सुनिता किशन कुमरे ही घोटी तालुका किनवट मधील महिला . सन् 2020-21 मध्ये लाभार्थ्यांनी विहिरीला लागलेल्या पाण्याच्या आधारावर

कोरडवाहू सोडून आता बारमाही शेती करीत आहे. पूर्वी शेतात कापूस, तूर, ज्वारी, सोयाबीन हीच पिके घेतली जात.  परंतु आता या पिकासोबत गहू हरभरा, रब्बी, ज्वारी, मेथी, कोथिंबीर व भाजीपाला घेण्यात येत आहे. त्यामुळे उत्पन्न वाढल्याचे त्यांनी सांगितले .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अनुसूचित जाती, जमाती या प्रगती लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात येते. 21- 22 मध्ये 2950.53 लक्ष निधी होता. 60 लक्ष खर्च झाला आहे. 624 लक्ष रुपयांची कामे सुरू आहेत.

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत अजून 21- 22 मध्ये प्राप्त निधी 350 लक्ष आहे .तांत्रिक मान्यता 457.50 लक्ष आणि खर्च 54 .35 लक्ष झाला आहे .रक्कम 1,6700 कामे सुरू आहेत. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना 21 -22 मध्ये प्राप्त निधी 100 लक्ष 77. 50 लक्ष तांत्रिक मान्यता आणि खर्च 10 .64 लक्ष झाला आहे.




कृषी विभाग, जिल्हा परिषद नांदेड
योजना : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना
लाभार्थीचे नाव : मनोज प्रल्हाद हिंगोले मु. कासारखेडा.
(गट क्र. 64)

# १३ पिंपळशेंडा

ग्रामीण रस्त्यांच्या विकासाला अधिक गती देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आहे. केंद्र शासनाच्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर या योजनेची आखणी करण्यात येते. या योजनेतून राज्यातील वाड्या, वस्त्या, गावांना रस्ते बांधून देण्याबरोबरच सध्या अस्तित्वात असलेल्या व दुरवस्था झालेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करण्यात येते.

राज्यातील अनेक गावे, विशेषत: दुर्गम भागातील गावे अजुनही रस्त्यांपासून दूर आहेत. रस्ते नसल्याने या गावातील विद्यार्थी, मुली यांना शिक्षणापासून दूर रहावे लागते. अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर इत्यादी लोक या गावात जाण्यास उत्सूक नसतात आणि त्याअभावी हे गाव आरोग्य, शिक्षण, पोषण, रोजगार इत्यादी प्राथमिक बाबींपासूनही कोसो दूर राहतात त्यातील किनवट तालुक्यातील पिंपळशेंडा हे गाव. कर्नाटक आणि तेलंगणाच्या सिमांना जवळीकता साधणार हे गाव. या गावाला सुविधेचा मार्ग नसल्याने 8 किमी अंतरावर असलेल्या मांडवी बाजारपेठेला जाण्यासाठी तब्बल 25 किमीचा फेरा पूर्ण करून जावे लागत होते. सदर मार्गासाठी खासदार हेमंत पाटील, स्थानिक आमदार भिमराव केराम व स्थानिक लोकांची आग्रही मागणी होती. या गावाची व्यथा लक्षात घेऊन राज्याचे तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अशोक चव्हाण यांनी 8 किमीच्या मार्गाबाबत जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांना निर्देश दिले होते. जिल्हाधिकारी डॉ. इटनकर व पिंपळगाव चे कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी या गावाला प्रत्यक्ष भेट देऊन पर्यायी मार्गाबाबत सर्व संबंधित विभागांना सोबत घेतले. यात वन विभागाच्या परवानगीपासून शेजारी तेलंगणा राज्याच्या जिल्हा प्रशासनासह समन्वय साधत विक्रमी वेळेत हा मार्गाच्या सर्व परवानग्या हस्तगत केल्या.

किनवट तालुक्यातील बहुसंख्य गावे आदिवासी क्षेत्रात मोडतात. यात जिल्हा प्रशासनाच्या सोईच्या दृष्टिने किनवट येथे सर्व प्रशासकीय कार्यालय देण्यात आली आहेत. तेलंगणाच्या काठावर असलेल्या मांडवी गावात शाळा, विद्यालय व बाजारपेठे असल्याने त्या परिसरातील गावांना मांडवीला जाणे क्रमप्राप्त आहे. मात्र मांडवीला पोहचण्यास केवळ सोईचा रस्ता नसल्याने 25 किमी अंतराचा फेरा पिंपळशेंडा गावासह इतर वाड्या-पाड्यातील लोकांना पडायचा. आता या नवीन मार्गामुळे मोठा दिलासा येथील लोकांना मिळाला आहे.

हा मार्ग मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत घेतला आहे. रस्ते विकास योजना 2001-21 अंतर्गत या रस्त्याचा क्रमांक हा ग्रामीण मार्ग 21 असा योगा-योगाने आला आहे.

सुमारे 8 किमी लांबीचा हा रस्ता सिमेंट काँक्रिटचा रस्ता असून याची रुंदी 3.30 मीटर एवढी धावपट्टीची रुंदी आहे. या कामासाठी 4 कोटी 69 लाख रुपये एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे.

प्रतिक्रिया १

रस्ता नसल्यामुळे आजारी माणसाला शहरात जाता येत नव्हते मुलांचं लग्न होताना सुद्धा इतर गावचे लोक मुलगी या गावात देताना विचार करत होते आता आमच्या गावाला रस्ता मंजूर झालेला आहे त्यामुळे आता रस्त्यांची सोय होईल.

प्रतिक्रिया २

गावातील शेती उत्पादनाचा माल गाडीने बाहेर नेता येत नव्हता. आता शेतमाल नेण्याची सुविधा होईल. विशेष म्हणजे मुलांना शाळा कॉलेजला जाण्याची सुविधा मिळणार आहे.


ग्राम पंचायत कार्यालय पिंपळशेंडा
ता.किनवट जि.नांदेड
रोजगार हमी योजनेतून समृद्ध महाराष्ट्र
रोजगार हमी योजनेतून


SPEED

# १५.    एक तास वाचनाचा

विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लगावी आणि विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृष्टी निर्माण व्हावी यासाठी शाळांचे ग्रंथालये समृद्ध करण्यात आली आहेत .नॅशनल बुक ट्रस्ट, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद आणि लोकसहभागातून शाळा ग्रंथालयांची उभारणी करण्यात आली आहे .ज्या शाळा डिजिटल आहेत अशा शाळांमध्ये डिजिटल लायब्ररी विकसित करण्यात आली आहे .जिल्ह्यात 2196 जि.प. प्राथमिक शाळांमधून दर शनिवारी एक तास वाचनाचा उपक्रम घेतला जातो .विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. विद्यार्थी पुस्तके वाचतात आणि त्यावर आपले मनोगत लिहितात .पुस्तकांविषयी बोलतात.



